action edn92


MCAER कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आय्.एस्.ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी : (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.


**जलद टपालाने**

जा.क्र. मकृप/शिक्षण/प्र.क्र.८१६/५६८ दि.१८ मार्च,२०१६

## परिपत्रक

**विषय:- कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांकडून प्रत्येकी रू.२०.०० लाख अनामत रक्कम कृषी परिषद कार्यालयाकडे जमा करण्याबाबत.**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत खाजगी संस्थांना कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावर कृषी व संलग्न विद्याशाखांची महाविद्यालये सुरु करण्यास कृषी परिषदेकडून मान्यता प्रदान करण्यात येते. यासाठी संबंधित संस्थेकडून बँक गॅरंटी रू.२.५० लाख आणि अनामत रक्कम रू.२.५० लाख संबंधित कृषी विद्यापीठाकडे जमा करण्यात येत असे. कृषी परिषदेच्या ७२ व्या बैठकीतील विषय क्र. ८ अन्वये सदरची रक्कम प्रत्येकी रू. ५.०० लाख अशी वाढविण्यात आली. कृषी परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/३९१५/२८८, दि. ११/२/२०१६ अन्वये सदरची रक्कम रू.२०.०० लाख अशी करण्यात आलेली आहे.

विना अनुदानित महाविद्यालयांवर गुणवत्ता नियंत्रण असण्याच्या दृष्टिकोनातून या महाविद्यालयांना भेटी देणे, महाविद्यालयांच्या तपासणीसाठी सल्लागार (consultant) नियुक्त करणे, आवश्यकता भासल्यास परिषदेतील कर्मचारी वाढविणे इत्यादी बाबींकरिता कृषी परिषद कार्यालयाचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढणे आवश्यक आहे. याचबरोबर एखाद्या महाविद्यालयामध्ये गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास जसे महाविद्यालय बंद पडणे, शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध नसणे, आवश्यक सोयी-सुविधा नसणे, कोणत्याही कारणास्तव मान्यता रद्द होणे अशा बाबींसाठी की जेणेकरून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था इतरत्र करणे या कामी सदर अनामत रक्कम आवश्यक ठरणार आहे.

वरील बाबी विचारात घेता, **सध्या अस्तित्वात असलेल्या १५६ कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांना रू.२०.०० लाख अनामत रकमेची बाब लागू करण्यात येत आहे. सदरची रक्कम किमान १० वर्षे कृषी परिषद कार्यालयाच्या खात्यावर जमा राहील.**

यास्तव कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, त्यांनी यापूर्वी कृषी विद्यापीठांकडे जमा केलेली अनामत रक्कम वगळता उर्वरित रक्कम कृषी परिषदेकडे जमा करावी.

कृषी विद्यापीठांना सूचित करण्यात येते की, कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांकडून कृषी विद्यापीठांकडे जमा करण्यात आलेली अनामत रक्कम कृषी विद्यापीठांनी महाविद्यालयनिहाय माहितीसह कृषी परिषदेकडे जमा करावी.

सदरच्या रक्कमा कृषी विद्यापीठांनी तसेच कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांनी **सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी RTGS द्वारे कृषी परिषदेचे स्टेट बँक ऑफ इंडिया, विद्यापीठ रोड शाखा (पुणे) Branch Code 07339, IFSC Code No. SBIN0007339 येथील खाते क्रमांक १०११९८६६३७८४ मध्ये विनाविलंब जमा कराव्यात.** रक्कम जमा केल्याबाबत कृषी विद्यापीठे व कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांनी पावतीसह या कार्यालयास अवगत करावे. **दि. ५ मे,२०१६ पर्यंत संबंधित संस्थेकडून अनामत रक्कम प्राप्त न झाल्यास संबंधित महाविद्यालयाचे नाव प्रवेश प्रक्रियेतून वगळण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**मा.मंत्री (कृषी) तथा**
**अध्यक्ष, कृषी परिषद**
**यांच्या मान्यतेने.**

**महासंचालक**

प्रति,

१. कुलसचिव / नियंत्रक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर
२. कुलसचिव / नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
३. कुलसचिव / नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
४. कुलसचिव / नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
५. प्राचार्य, सर्व कृषी विद्यापीठांतर्गत कायमस्वरूपी विना अनुदानित तत्वावरील सर्व महाविद्यालये.

प्रतः-

१. मा. मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे विशेष कार्य अधिकारी, मा.मंत्री (कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. उपाध्यक्ष यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
३. वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
४. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.
   यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
५. निवड नस्ती.